मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘मिरॅकल ऑन व्हील्स’ने जिंकली उपस्थितांची मने

## ‘पर्पल जल्लोष’ मध्ये दिव्यांगांद्वारे सादर करण्यात आला सांस्कृतिक कार्यक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

थिरकणाऱ्या व्हीलचेअर्स... रसिकांच्या टाळ्यांचा निनाद... दिव्यांग कलाकारांकडून सादर करण्यात आलेला अद्भूत अविष्कार.... भरतनाट्य, कथ्थक नृत्याची जुगलबंदी.... सुफी नृत्य... मार्शल आर्ट... यांचा सुरेख मिलाफ असणारे विलोभनीय नृत्य.... हे पाहताना उपस्थितांच्या अंगावर उमटलेले शहारे आणि नकळत आलेले डोळ्यांत पाणी... या सर्वांचा अद्भूत संगम असलेला अविश्वसनीय असा ‘मिरॅकल ऑन व्हील्स’ या रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनावर अधिराज्य गाजवले.



दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणत त्यांच्या उत्कर्ष आणि विकासासाठी पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी १७ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत चिंचवड येथील ऑटो क्लस्टर प्रदर्शन केंद्र येथे ‘पर्पल जल्लोष’ हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाचे सचिव राजेश अगरवाल, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, उपआयुक्त विठ्ठल जोशी, अण्णा बोदडे, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, तानाजी नरळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, सल्लागार विजय कान्हेकर, अभिजित मुरुगकर, दिव्यांग संघटनेचे प्रतिनिधी मानव कांबळे, दत्तात्रय भोसले तसेच विविध राज्यातील दिव्यांग कल्याण आयुक्त यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘मिरॅकल ऑन व्हील्स’ कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. त्यानंतर शिवनृत्य, भरतनाट्य, कथ्थक जुगलबंदी सादर करण्यात आली. यावेळी दिव्यांग बांधवांनी हनुमान चालिसा नृत्य करीत त्या माध्यमातून रामायणातील प्रसंग दाखवला. तसेच काळजाचा ठेका चुकवणारे मार्शल आर्ट्सवरील नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. ख्वाजा मेरे ख्वाजा या प्रसिद्ध गाण्यावर सादर करण्यात आलेल्या सुफी नृत्याने रसिकांची मने जिंकली. राष्ट्रभक्तीपर गीतांवर नृत्य सादर करीत उपस्थितांमध्ये देशप्रेमाची भावना जागृती केली. हा सांस्कृतिक कार्यक्रम आत्मविश्वासाने सादर करीत एकप्रकारे आम्ही कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत, हे दिव्यांग कलाकारांनी दाखवून दिले. या कार्यक्रमाचे निर्माते-दिग्दर्शक डॉ.सय्यद पाशा यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन करून व्हील चेअरवरील नृत्याच्या अविष्काराबाबत पार्श्वभूमी सांगून कलाक्षेत्रात दिव्यांगांचे सुद्धा विशेष स्थान असून त्यांच्यामधील आत्मविश्वास रसिकांनी दाद आणि प्रोत्साहन देऊन तेवत ठेवला पाहिजे, अशी साद देखील रसिकांना घातली.

> “ दिव्यांग बांधवांच्या उत्कर्षासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने पर्पल जल्लोष - दिव्यांगांच्या महाउत्सवाचे अतिशय उत्कृष्टरित्या आयोजन केले आहे, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. एखाद्या स्थानिक स्वराज संस्थेने आयोजित केलेला भारतातील हा सर्वात मोठा उत्सव आहे. या उत्सवात मिरॅकल ऑन व्हील्स कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. हा कार्यक्रम म्हणजे अविश्वसनीय, अद्भूत असाच आहे.
>
> **- राजेश अगरवाल, सचिव , केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय.**

---

# लक्ष्मी चौकामधील अनधिकृत बांधकामावर पीएमआरडीएची कारवाई!

## 50 पेक्षा अधिक अनधिकृत पत्राशेड, कठडे, सिमा भिंती, पक्की बांधकामे आदीवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी भागातील लक्ष्मी चौकात अनधिकृत पत्राशेड, बांधकामांवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पथकाकडून शुक्रवारी (दि.१७) निष्कासनाची कारवाई करण्यात आली. अनधिकृतपणे उभारलेले अनेक बांधकामावर पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम व निर्मुलन विभागाने कारवाई केली. या कारवाईमुळे निश्चितच या भागातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



हिंजवडीतील लक्ष्मी चौकात अनधिकृत बांधकामे करण्यात आल्याने रहदारीस अडचणी येत असल्याच्या तक्रारी होत्या. याची दखल घेत पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम व निर्मुलन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागासोबत या भागातील ५० पेक्षा अधिक अनधिकृत पत्राशेड, कठडे, सिमा भिंती, पक्की बांधकामे आदीवर शुक्रवारी (दि.१७) सकाळीपासून सांयकाळपर्यंत निष्कासनाची कारवाई पार पाडली. यावेळी उपस्थित पीएमआरडीएच्या अधिकारी यांचेमार्फत सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम करू नये, असे आवाहन करण्यात आले.

संबंधित कारवाई पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पोलिस अधिक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अनधिकृत बांधकाम व निर्मुलन विभागाच्या सह आयुक्त (प्र) डॉ. दीप्ती सूर्यवंशी - पाटील, उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, तहसीलदार सचिन मस्के, तहसीलदार राजेंद्र रांजणे, पोलिस निरीक्षक महेशकुमार सरतापे, कनिष्ठ अभियंता, पोलिस कर्मचारी यांनी पार पाडली. प्राधिकरणाच्या हद्दीतील अनधिकृत होर्डिंगसह अनधिकृत बांधकामांचा सर्व्हे करण्यात येत असून त्यांच्यावर निष्कासनाची कारवाई करण्यात येणार असल्याचे पीएमआरडीएने स्पष्ट केले.

# महापालिका निवडणुकीची साखरपेरणी!

## माजी नगरसेवकांच्या प्रभागात 12 कोटी 60 लाख रुपयांचा निधी मंजूर : महायुतीला झुकते माप

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर महापालिका निवडणुकीची लगीनघाई सुरू झाली असून, स्थायी समितीच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत महायुतीच्या काही माजी नगरसेवकांच्या प्रभागात १२ कोटी ६० लाख रुपयांचा निधी वळविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सांडपाणी वाहिन्या टाकणे, रस्ते दुरुस्ती अशा कामांसाठी हा निधी वापरला जाणार आहे.



महापालिकेची निवडणूक येत्या काही महिन्यांत होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. गेल्या अडीच वर्षांपासून महापालिकेची निवडणूक रखडली आहे. त्यामुळे महापालिकेत प्रशासक राज आहे. महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये विविध विभागांसाठी तरतूद केली जाते. आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यासाठी अडीच महिने शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे ज्या कामासाठी तरतूद केली आहे आणि तिचा वापर झाला नाही, असा निधी अन्य कामांसाठी वळविण्याबाबतचे प्रस्ताव (वर्गीकरण प्रस्ताव) स्थायी समितीपुढे ठेवले जात आहेत. प्रशासनाबरोबरच राजकीय पदाधिकाऱ्यांकडूनही तसे प्रस्ताव दिले जात आहेत. प्रशासक आणि आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत १२ कोटी ६० लाखांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले. हे सर्व प्रस्ताव महायुतीच्या माजी नगरसेवकांच्या प्रभागातील कामांचे आहेत.

या प्रभागांतील कामे समाविष्ट गावातील सांडपाणी प्रकल्प आणि पाणीपुरवठ्याच्या शिल्लक निधीतून करण्यात येणार आहेत. दरम्यान, गेल्या महिन्यात ३८ कोटी रुपयांच्या वर्गीकरणाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती. हा निधी बाणेर आणि बालेवाडी येथील कामांसाठी मंजूर करण्यात आला होता.

### कुठे, किती निधी?

- प्रभाग क्रमांक ३ (विमाननगर-सोमनाथनगर) – ६० लाख रुपये
- प्रभाग क्रमांक ८ (औंध-बोपोडी) – १ कोटी
- प्रभाग क्रमांक ९, १२ (बाणेर, बावधन, रामबाग कॉलनी, मयूर कॉलनी) – ४ कोटी ५ लाख रुपये
- प्रभाग क्रमांक १३ (एरंडवणे) – ५० लाख रुपये
- प्रभाग क्रमांक १७ (रास्ता पेठ-रविवार पेठ) – १ कोटी रुपये
- प्रभाग क्रमांक १८ (खडकमाळ आळी) – १ कोटी ७५ लाख रुपये
- प्रभाग क्रमांक १८ (लोहियानगर-कासेवाडी) – १ कोटी २५ लाख रुपये
- प्रभाग क्रमांक २४ (रामटेकडी) – ५० लाख रुपये
- प्रभाग क्रमांक २९ (नवी पेठ, पर्वती) – २ कोटी रुपये
- प्रभाग क्रमांक ३१ (कर्वेनगर) ५० लाख रुपये

> समाविष्ट गावांतील पाणीपुरवठा विषयक कामे आणि सांडपाणी वहन व्यवस्थेसंदर्भात या निधीतून कामे होणार आहेत. मंजूर करण्यात आलेल्या वर्गीकरणांच्या प्रस्तावाचा राजकीय संबंध नाही. चालू आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीमधून कामे होणार आहेत. महापालिका प्रशासनाकडे प्रभागांत विविध कामे करण्यासंदर्भात पत्रव्यवहार झाले आहेत. त्याचा विचार पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात केला जाईल.
> **- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, महापालिका.**

# पिंपरीत 400 एकरमध्ये होणार निरंकारी संत समागम

## 24 जानेवारीपासून तीन दिवस चालणार कार्यक्रम : समागम स्थळावर स्वच्छतेची विशेष काळजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा ५८ वा निरंकारी संत समागम सुरु होण्यास अवघे काही दिवस उरले असल्याने समागमाच्या पूर्वतयारीमध्ये लागलेले निरंकारी भाविक भक्तगण समागम स्थळ समतल व सुंदर बनविण्यासाठी त्यामधील प्रत्येक व्यवस्थेला अंतिम रुप देत आहेत. समागमाच्या पूर्वतयारीमध्ये पुणे झोनसह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो सेवादल स्वयंसेवक आणि भाविक भक्तगण सातत्याने आपल्या निष्काम सेवा अर्पण करत आहेत.



पिंपरीतील मिलिटरी डेअरी फार्मच्या सुमारे ४०० एकरच्या विस्तीर्ण मैदानात शुक्रवार, दि.२४ जानेवारी २०२५ पासून हा तीन दिवसीय संत समागम सुरू होत असून, त्याची सांगता २६ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. मुख्य सत्संग कार्यक्रम दररोज दुपारी २ वाजता सुरू होईल ज्यामध्ये अनेक वक्ते, गीतकार, कवी सद्गुरु आणि ईश्वराप्रती आपल्या मनातील भावना व्यक्त करतील. शेवटी रात्री ८ वाजल्यापासून सर्वांना सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांचा पवित्र आशीर्वाद लाभणार आहे.

मागील एक महिन्यापासून महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यांतून निरंकारी भक्तगणांनी समागम स्थळांवर येऊन आपल्या निष्काम सेवांच्या माध्यमातून समागम स्थळाला एका सुंदर नगरीच्या रुपात परिवर्तित केले आहे. सर्व श्रद्धाळू ज्या उत्साहाने, आवडीने, भक्तिभावाने, मर्यादा व अनुशासनाचे पालन करत आपल्या सेवा निभावत आहेत ते पाहून जनसामान्य अत्यंत प्रभावित आहेत. समागम स्थळाचे हे अनुपम दृश्य आजूबाजूने जाणाऱ्या वाटसरूंना आणि स्थानिक नागरिकांना आकर्षण व उत्सुकतेचे केंद्र बनून राहिले आहे.

मानवतेच्या कल्याणासाठी आयोजित केलेल्या या संत समागमाचे साक्षी बनण्यासाठी समस्त भाविकांना व निरंकारी भक्तगणांना नुक्कड नाटक, बॅनर तसेच पुण्याच्या कानाकोपऱ्यात खुल्या प्रांगणांमध्ये सत्संगच्या माध्यमातून सादर आमंत्रित केले जात आहे ज्यायोगे त्यांनी या संत समागमामध्ये सहभागी होऊन आपले जीवन सार्थक करावे.

समागमात सहभागी होणाऱ्या सर्व भक्तगणांसाठी व्यापक स्तरावर निवासी तंबू, लंगर, कॅन्टीन, दवाखाने, सुरक्षा व्यवस्था, पार्किंग आणि रेल्वे स्थानक आणि बसस्थानकातून ये-जा करण्यासाठी वाहतूक व्यवस्था इत्यादीची यथोचित व्यवस्था करण्यात आली आहे. समागम स्थळावर स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जात आहे. प्रकाशन विभागाकडून समागम स्थळावर वेगवेगळ्या ठिकाणी स्टॉल लावले जात आहेत. संत निरंकारी मिशनचे सचित्र दर्शन घडविण्यासाठी आकर्षक निरंकारी प्रदर्शनीचेही आयोजन केले जात आहे यासह एकूण आठ कार्यशाळा असलेली भव्य बाल प्रदर्शनी देखील असेल, प्रत्येक कार्यशाळा मुलांना आकर्षक आणि शैक्षणिक अनुभव प्रदान करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. हे सर्व सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनानेच शक्य झाले आहे.

भक्तिभावाने केल्या गेलेल्या या सर्व पूर्वतयारीमध्ये कुशलतेची एक सुंदर झलक पहायला मिळत आहे. निश्चितच या संत समागम मध्ये देश-विदेशातील विविधतेने नटलेल्या संस्कृतीची व सार्वभौमत्वाची छटा उमटलेली पहायला मिळेल आणि यामध्ये सहभागी होणारे समस्त भाविक भक्तगण अलौकिक आनंदाची प्राप्ती करत सद्गुरु व संतांच्या दिव्य वाणीने प्रभावित होऊन आपल्या जीवनाच्या मूळ उद्देशाकडे अग्रेसर होत प्रेमाभक्तीच्या भावनेचा विस्तार करतील. मानवतेच्या या महामेळाव्यासाठी प्रत्येक धर्मप्रेमी बंधू भगिनींना आदरपूर्वक आमंत्रित करण्यात येत आहे.

# करारातील उत्पन्नात पिंपरी-चिंचवड आगार पिछाडीवर

## गाठला केवळ साडेअकरा लाखांचा टप्पा, सहलींसाठी शाळांनी फिरवली एसटी मंडळाकडे पाठ

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पुणे विभागात डिसेंबर महिन्यात ५७३ बस विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी आरक्षित झाल्या. या प्रासंगिक करारामधून पिंपरी-चिंचवड आगार मात्र पिछाडीवर राहिले आहे. या माध्यमातून शहर आगाराला केवळ ११ लाख ८९ हजाराचे उत्पन्न मिळाले, तर सर्वाधिक १६ लाखांचे उत्पन्न राजगुरुनगर आगाराला मिळाले आहे.

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पुणे विभागात डिसेंबर महिन्यात ५७३ बस विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी आरक्षित झाल्या. या प्रासंगिक करारामधून पिंपरी-चिंचवड आगार मात्र पिछाडीवर राहिले आहे. या माध्यमातून शहर आगाराला केवळ ११ लाख ८९ हजाराचे उत्पन्न मिळाले, तर सर्वाधिक १६ लाखांचे उत्पन्न राजगुरुनगर आगाराला मिळाले आहे.



### पुणे विभागातील नव्या एसटी ठाण्यात?

» पुणे विभागातील आगारात नव्या कोऱ्या एसटी दाखल झाल्या होत्या. मात्र त्या पुन्हा ठाण्याच्या आगारात वळवण्यात आल्या. त्यामुळे आता पुन्हा पुणे शहरासाठी नव्या एसटी बसची वाट पाहावी लागणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून पुण्याच्या विविध आगारातील एसटी बसला १४ वर्षे उलटून गेली आहेत. तरीही त्या सेवेत आहेत.

विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक वारसा प्रत्यक्ष पाहता यावा व त्याची माहिती मिळावी, म्हणून दरवर्षी शैक्षणिक सहलीला मान्यता देण्यात आली आहे. डिसेंबरपासून शाळांकडून शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात येते. शिक्षण विभागाने शैक्षणिक सहलीसंदर्भात नियमावली जारी केली असून, यात सहलीला फक्त एसटी बसचाच वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सरकार मान्यता असलेल्या शाळांना तब्बल ५० टक्के सवलत या शैक्षणिक सहलीत एसटीकडून दिली जाते.

नोव्हेंबर २०२४ मध्ये पुणे विभागातील १५ आगारांत १०१ एसटी बस सहलीसाठी बुकिंग झाल्या होत्या. यातून एसटीला १४ लाख ९४ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले, तर डिसेंबर २०२४ मध्ये ५७३ एसटी बस बुकिंग झाल्या होत्या. यातून एसटीला एक कोटी ३० लाख ७५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले. २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये उत्पन्न घटल्याचे दिसून येते. पुणे विभागात सहलीसाठी सर्वाधिक ९३ बस स्वारगेट आगारात, त्यानंतर राजगुरुनगर आगारात ८४ आणि पिंपरी-चिंचवड आगारात ६२ बस बुकिंग झाल्या.

### उतरता आलेख

» पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात महाविद्यालय, शाळा आहेत. त्यामुळे प्रत्यक्षामध्ये सहलीच्या माध्यमातून उत्पन्न मंडळाचे मोठे साधन आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून हा उत्पन्न मार्ग घटत आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे बसेसची अतल्पसंख्या आहे. सहलीसाठी बस आरक्षित झाल्यास आगारातून सुटणाऱ्या अन्य मार्गावरील बस बंद करावे लागतात

### सर्वाधिक उत्पन्न मिळवलेले आगार

» पुणे विभागातील स्वारगेट या स्थानकाने सर्वाधिक म्हणजे १४ लाख ५८ हजार रुपयांचे उत्पन्न या माध्यमातून मिळवले आहे. यासाठी ९३ बस धावल्या, तर दुसरीकडे राजगुरुनगर आगारातून ८४ बसच्या माध्यमातून १६ लाख ४४ हजार उत्पन्न मिळाले, तर सर्वात कमी पिंपरी-चिंचवड आगाराला अवघे ११ लाख ८९ हजार उत्पन्न ६२ बसेसच्या माध्यमातून प्राप्त झाले.

# झाडांभोवतीची विद्युतरोषणाई ठरतेय फास

## पशू-पक्ष्यांसह छोट्या-छोट्या जिवांना हानिकारक, पर्यावरणप्रेमी संतापले; प्रदूषणात भर पडत असल्याचा केला दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर, वाकड, निगडी, आकुर्डीसह शहरातील विविध परिसरात झाडांवर विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे. यामुळे पशू-पक्ष्यांनाही छोट्या-छोट्या जिवांना हानी पोहोचत असून झाडांचे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रदूषणातही भर पडत आहे. याकडे महापालिकेच्या उद्यान विभागाने कानाडोळा केला असून झाडांवर विद्युत रोषणाई करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींतून होत आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात झाडांवर विद्युत रोषणाई केली जात आहे. या रोषणाईमुळे झाडांचे नुकसान होत असून प्रदूषणातही भर पडत आहे. आपल्या व्यावसायिक आस्थापनांसमोर शेकडो नागरिक आकर्षण म्हणून झाडांवर विद्युत रोषणाई करत आहेत. झाडाला खिळे ठोकले जात आहेत. विद्युत तारा सोडल्या जात आहेत. यामुळे झाडांची वाढ खुंटत आहे. परिणामी, पर्यावरणालाही धोका निर्माण होत आहे. याशिवाय रात्रीच्या वेळी झाडावर राहणाऱ्या पशू-पक्ष्यांनाही विद्युत रोषणाईचा त्रास होतो. अनेकदा आकर्षक व सौंदर्याचा भाग म्हणून झाडांभोवती सर्रास गुंडाळण्यात येणाऱ्या विविध रंगांच्या एलईडी लाईट्स फक्त झाडांना हानिकारक ठरत नसून संपूर्ण जैवसंस्थेला आणि त्यातील छोट्या-छोट्या जिवांना हानीकारक ठरत असल्याचा दावा पर्यावरणप्रेमी करत आहेत.

महापालिकेनेही अनेक ठिकाणी तर झाडांना रंगरंगोटी केलेली आहे. अशाप्रकारे खोडांना रंग चढवला गेल्यास त्यांचे आयुष्य कमी होत असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे. त्यामुळे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडून तज्ज्ञांचा सल्ला घेऊन ही कार्यवाही करण्यात येते का, असा प्रश्न उद्यान अधिकाऱ्यांकडे उपस्थित करण्यात येत आहे. दरम्यान, शहरातील रस्त्यालगत दुतर्फा लावलेली ही झाडे महापालिकेच्या मालकीची आहेत. झाडांवर विद्युत रोषणाई करता येत नाही. ते वन्यजीव कायद्याचे उल्लंघन ठरते. तत्कालीन आयुक्तांनीही झाडे रंगवली होती. आताचे आयुक्त शेखर सिंह हेदेखील त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. यामुळे पर्यावरणविषयक नियमांचे उल्लंघन करत अनेकजण झाडांवर विद्युत रोषणाई करत आहेत. त्यामुळे ही विद्युत रोषणाई तातडीने काढावी.आयुक्त शेखर सिंह यांनी लक्ष घालून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी नागरिकांतून होत आहे.

### कायद्याचे सर्रास उल्लंघन

» झाडांचे संरक्षण आणि संवर्धन कायदा १९७५ अनुसार झाडांवर विद्युत रोषणाई करणे, विद्युत तारा, केबल सोडणे हे कायद्याचे उल्लंघन आहे. झाडांवर तारा सोडायच्या असल्यास तशी रीतसर परवानगी घेणे बंधनकारक आहे, मात्र अशी सरसकट परवानगी कुठेच घेताना दिसून येत नाही. त्यामुळे झाडांची हानी होत असून कायद्याचे उल्लंघन करत विद्युत रोषणाई केली जात आहे. त्याकडे महापालिका उद्यान विभागाचे दुर्लक्ष होत आहे.

" महापालिकेच्या फूटपाथ, रस्ते दुभाजक असलेल्या झाडांवर कोणीही विद्युत रोषणाई करू नये. उद्यान विभागाचे निरीक्षक यावर लक्ष ठेवून असतात. अशी गोष्ट निर्दशनास आल्यास त्या आस्थापना मालकांना त्यासाठी मनाई केली जाते. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून विद्युत रोषणाई केलेली साहित्य जप्त केले जाते. त्यानुसार शहरात जिथे कुठे असेल, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

-उमेश ढाकणे, साहाय्यक आयुक्त, उद्यान विभाग, महापालिका

# बारामतीची कृषीपंढरी गजबजली

## आमदार सुरेश धस यांनीही दिली भेट ; परराज्यातूनही हजारो शेतकऱ्यांची गर्दी

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीच्या ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्राने आयोजित केलेल्या दहाव्या कृषी प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी राज्यभरातून विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातूनही हजारो शेतकऱ्यांनी गर्दी केली. पुरुष शेतकऱ्यांबरोबरच महिला आणि युवक, युवतींची संख्या यामध्ये लक्षणीय होती.

राज्यभरातून शुक्रवारी (दि. 17) सकाळी आठ वाजल्यापासूनच आलेल्या वाहनांनी येथील परिसर गजबजून गेला होता. या प्रदर्शनाला भाजपचे आमदार सुरेश धस तसेच कोल्हापूरच्या संयोगिताराजे छत्रपती, माजी मात्री अनिल देशमुख यांनी भेट दिली. यावेळी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार व विश्वस्त सुनंदा पवार यांनी त्यांना अधिक माहिती दिली. कृषिक प्रदर्शनाला मराठी चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे यांनीही भेट दिली.

होमिओपॅथी औषधावर आधारित आणि लुप्त होत चाललेल्या देशी वाणांना पुनर्जीवित करण्यासाठी घेतलेल्या तब्बल 58 प्रकारची पिके पाहत शेतकऱ्यांनी आवर्जून याची माहिती घेतली. पिकावर कोणत्याही प्रकारचा रासायनिक प्रादुर्भाव न करणारी होमिओपॅथिक औषधे भविष्यातील शेतीसाठी उपयोगी पडतील याची खूणगाठ बांधत त्या औषधांचे प्रमाण आणि औषधांची माहिती शेतकरी आवर्जून घेत होते.

शेतकऱ्यांनी बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रात उत्पादित केलेल्या राशी या जातीच्या कापूस पिकाची पाहणी केली. त्याचबरोबर कापूस पिकामध्ये यांत्रिकीकरणाची युग आणल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो असा विश्वास देखील या ठिकाणी नाशिकच्या किशोर वाघ व त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकऱ्यांना दाखवलेल्या प्रात्यक्षिकातून आला. प्रदर्शनाचे वैशिष्ट्य ठरलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रावर आधारित ऊसाच्या शेतीवरती सर्वाधिक गर्दी शेतकऱ्यांनी केली होती. या ठिकाणी उसाच्या विविध जाती कशाप्रकारे वाढलेल्या आहेत



### 11 कोटींचा सोनेरी मारवाडी घोडा

» पशुप्रदर्शनाचे स्वतंत्र दालन असलेल्या या या प्रदर्शनात हैदराबादच्या हसन बिन त्रीप यांनी आणलेला 11 कोटींचा सोनेरी मारवाडी घोडा तसेच नांदेडच्या मालेगाव तालुक्यातील लोहा तालुक्यातील विश्वनाथ जाधव यांनी आणलेल्या राम व रावण या लालकंधारी जातीच्या बैलांची जोडी तसेच माणसाळलेली व माणसाला मुका देणारे सोन्या, मोन्या बैल शेतकरी आवर्जून पाहत होते.

### राशी कापूस पिकाची पाहणी

» विदर्भ आणि मराठवाड्यात कापसाची शेती सर्वाधिक असल्याने या शेतीशी संबंधित समस्या जाणून घेण्यासाठी शेतकऱ्यांनी बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रात उत्पादित केलेल्या राशी या जातीच्या कापूस पिकाची पाहणी केली. त्याचबरोबर कापूस पिकामध्ये यांत्रिकीकरणाची युग आणल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो असा विश्वास देखील या ठिकाणी नाशिकच्या किशोर वाघ व त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकऱ्यांना दाखवलेल्या प्रात्यक्षिकातून आला.

### आर्टिफिशल इंटेलिजन्स

» या वेळच्या प्रदर्शानाचे वैशिष्ट्य ठरलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रावर आधारित ऊसाच्या शेतीवरती सर्वाधिक गर्दी शेतकऱ्यांनी केली होती. या ठिकाणी उसाच्या विविध जाती कशाप्रकारे वाढलेल्या आहेत आणि आर्टिफिशल इंटेलिजन्स हे तंत्र नेमके कसे काम करते हे शेतकऱ्यांनी या ठिकाणी जाणून घेतले.

> कृषी प्रदर्शनाचे ठिकाण उत्तम आहे, प्रदर्शन ठिकाणचे प्लॉट वरील मार्गदर्शन नाविन्य आणि प्रदर्शन दर्जा उत्तम आहे, ऊसातील कृत्रिम बुद्धिमत्ता प्लॉट आवडले.
> -सुरेश मोते, शेतकरी, नेवासा जि. अहिल्यानगर

# इंद्रायणी पाठोपाठ भामा नदीही फेसाळली; केमिकलयुक्त पाणी सर्रास नदीपात्रात

## इंद्रायणी नदी बरोबर खेड तालुक्यातील भामा नदी ही केमिकलयुक्त पाण्यामुळे फेसाळली असून आता भामा नदीच्या प्रदूषणाचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचं श्रद्धास्थान असणारी इंद्रायणी नदी बरोबर खेड तालुक्यातील भामा नदी ही केमिकलयुक्त पाण्यामुळे फेसाळली असून आता भामा नदीच्या प्रदूषणाचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. भामचंद्र डोंगरापासून सुरू झालेली भामा नदी पुढे जाऊन शेलगाव येथे भीमा नदीला मिळते. या नदीच्या काठावर चाकण औद्योगिक वसाहतीच्या अनेक कंपन्या आहेत.

या कंपन्यांच रसायन युक्त आणि सांडपाणी इंद्रायणी आणि भामा नदीत सोडले जाते. त्यामुळे या नद्यांना हिमनद्यांचे स्वरूप प्राप्त होत आहे. या रसायनयुक्त पाण्यामुळे वाकी, काळुस, भोसे, शेलगाव व परिसरातील शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. या रसायन युक्त पाण्यामुळे भामा नदीतील जलचर प्राणी नष्ट होत आहे.

नदी प्रदुषणाचे पाप पाप चाकण औद्योगिक वसाहतीतील कंपन्या मालक करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. हे पाप करणाऱ्या कंपन्यांना राज्य सरकार पाठीशी घालत असल्याच वेळोवेळी दिसून आले आहे. सरकारला शेतकऱ्यांपेक्षा अवैधरित्या चालणाऱ्या कंपन्या महत्त्वाच्या का वाटतात? अनेक वेळा मंत्र्यांनी नदी प्रदूषणाकडे लक्ष वेधलं तरी त्या कंपन्यांना का वाचवले जातेय? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला नक्की केव्हा जाग येणार? असे प्रश्न यानिमित्ताने पुन्हा उभे ठाकलेत.



### सरकार उदासीन का?

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार मातब्बर मंत्र्यांना याबाबत खडानखडा माहितेय. तरी लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असणाऱ्या इंद्रायणी, भामा नदीबाबत हे सरकार किती उदासीन आहे. हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे, त्यामुळे सरकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर जोपर्यंत कारवाई करत नाही. तोपर्यंत वारकऱ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या जीवाशी सुरू असलेला खेळ असाच सुरु राहणार, हे उघड आहे.

### नागरिकांच्या आणि पाळीव प्राण्यांच्या जीवाशी खेळ सुरुच

» पिंपरी चिंचवड, पुणे, आळंदी, चाकण परिसरातील नागरिक याच नदीचे पाणी पिण्यासाठी वापरतातखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना वरदान ठरलेली हीच ती भामानदीराज्य सरकारला शेतकऱ्यांपेक्षा मूठभर कंपन्या महत्वाच्या वाटतात?